**Annexure-XI**

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
**Inspection Committee Report for Academic Year 2026-2027**
**Attendance Details/ Research Details/ Welfare Scheme Details**
*****All report must be available on web site**

**Name of College/Institute:** Smt.vimaltai Batesing Raghuvanshi College of Nursing Nandurbar

**Faculty**-Nursing

| | | |
|---|---|---|
| 1 | Attendance<br>Teaching Staff- Available<br>Non-teaching staff- Available<br>Hospital Staff- Available<br>UG Students - Available | Month-wise Biometric attendance to be uploaded by the college on College Website<br><br>(No hard copies of attendance to be submitted to the University) |
| 2 | Project | Nil |
| | Research Articles/Publications | Nil |
| | Research Award(Student/Teacher) | Nil |
| 3 | **Utilization of Student Welfare Schemes:-** | |
| | Earn and Learn Scheme | 5 Students |
| | Dhanwantri Vidyadhan Scheme | Nil |
| | Sanjivani Student Safety Scheme | |
| | Student Safety Scheme | |
| | Book Bank Scheme | |
| | Savitribai Phule Vidyadhan Scheme | 2 Students |
| | Bahishal Shikshan Mandal Scheme | Yes |
| 4 | **Sport participants/Other Activities:** | |
| | i) Information of Student(s) who participated University level & State level Avishkar Competition. | Nil |
| | ii) Information of Student(s) who participated in Regional Sport Competition & State level Sports Competition. | |
| | iii) Information of Student(s)who participated in Cultural Activities. | |
| | iv) Does the college have NSS Unit? | |
| 5 | Whether "Swaccha Bharat Abhiyan" implemented in College | Yes |

**Here by I declare all relevant document uploaded are clear and visible on web site & are true as per my knowledge & Belief**
**Any Other, Please Specify:-**

MHT/CET CODE-09436

Principal

नंददर्शन
संस्थापक संपादक- स्व.विठ्ठलसिंग आप्पा राजपूत



# रघुवंशी नर्सिंग महाविद्यालयात बहि:शाल शिक्षण व्याख्यानमाला

नंदुरबार (प्रतिनिधी)- येथील नंताविस संचलीत श्रीमती विमलताई बटेसिंग रघुवंशी नर्सिंग महाविद्यालयात बहिशाल शिक्षण व्याख्यान झाले. या व्याख्यानातून सायबर क्राईम, महिला सुरक्षा सबलीकरण व व्यसनमुक्तता या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.



रघुवंशी नर्सिंग महाविद्यालय व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या विद्यमाने एक दिवसीय व्याख्यानमाला कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी दामिनी पथकाच्या प्रमुख ज्योती पाटील,अहिंसा आयुर्वेद महाविद्यालयाचे डॉ. प्रमोद खारकर, नंताविसचे समन्वयक डॉ.एम.एस. रघुवंशी, नर्सिंग महाविद्यालयाचे प्रा.भूषण ठोंबरे, विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक योगिनी सपकाळे आदी उपस्थित होते. या व्याख्यानमालेत प्रथम वर्ष बीएसए नर्सिंगचे एकूण ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. जिजामाता नर्सिंग महाविद्यालय व एमकेडी नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. ही व्याख्यानमाला सहा सत्रात पार पडली. यावेळी प्रा.भूषण ठोंबरे यांनी व्याख्यानमालेचे महत्व सांगितले. सायबर क्राईम विभागाचे किरण जिरे, महाले यांनी सायबर क्राईमवर तर दामिनी पथकाच्या ज्योती पाटील यांनी महिला सुरक्षा व सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच डॉ.प्रमोद खारकर यांनी आजचा युवक व व्यसनाधिनता या विषयी सांगितले. तसेच विविध महाविद्यालयाचे प्रा.डॉ.एस.एस.हसानी यांनी अँटी रॅगिंग व कायदेशीर तत्वे या विषयावर, जीटीपी महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाचे डॉ. एस.यु. अहिरे यांनी तणाव व्यवस्थापन, डॉ. विजय चौधरी यांनी आरोग्य, संवाद कॉशल्य विषयी मार्गदर्शन केले. समारोप सत्रात प्रा.अंजली तडवी यांनी कार्यक्रमाचा अहवाल सादर केला. सुत्रसंचालन शिक्षक मधुर वळवी व सोनल वळवी यांनी केले. आभार रोशनी तडवी यांनी मानले. यशस्वीतेसाठी शंकर वसावे, ममता कोळी, वंदना वळवी, कर्मचारी अशोक धोबी, आकाश शिंदे, विवेक मराठे, अमोल गवळी, कल्पना चौधरी यांनी परिश्रम घेतले.

Main Edition
Jan 24, 2026 Page No. 2
Powered by: erelego.com

दिव्य मराठी

# धुळे सिटी 25-01-2026

**व्याख्यानमाला** • नंताविस संचलित रघुवंशी नर्सिंग महाविद्यालयामध्ये केले एकदिवसीय आयोजन

# नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे

**प्रतिनिधी** | नंदुरबार

नंदुरबार तालुका विधायक समिती संचालित श्रीमती विमलताई बट्टेसिंग रघुवंशी नर्सिंग महाविद्यालय व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी-विद्यार्थ निंच्या व्यक्तिमत्त्व विकासाकरिता एक दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नंदुरबार येथील दामिनी पथकाच्या प्रमुख ज्योती पाटील, अहिंसा आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रमोद खारकर उपस्थित होते. नंदुरबार तालुका विधायक समितीचे समन्वयक डॉ.एम.एस. रघुवंशी, नर्सिंग महाविद्यालयाचे प्रा.भूषण ठोंबरे, विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक योगिनी सपकाळे उपस्थित होते. व्याख्यानमालेत एकूण सहा सत्रांचे आयोजन करण्यात आले. प्रा. भूषण ठोंबरे यांनी या व्याख्यानमालेचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद करून सांगितले.

व्याख्यानमालेत जिजामाता नर्सिंग महाविद्यालय व एमकेडी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष बीएसएच्या एकूण ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रा.अंजली तडवी यांनी अहवाल वाचन केले. आभार शिक्षिका रोशनी तडवी यांनी मानले. शिक्षक मधुर वळवी व सोनल वळवी यांनी सूत्रसंचालन केले. यशस्वितेसाठी शंकर वसावे, ममता कोळी, वंदना वळवी, अशोक धोबी, आकाश शिंदे, विवेक मराठे, अमोल गवळी व कल्पना चौधरी यांनी परिश्रम घेतले.



बहि:शाल शिक्षण व्याख्यानमालेप्रसंगी उपस्थित मान्यवर.

## विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी प्रात्यक्षिकासह केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

प्रथम सत्रात नंदुरबार येथील सायबर क्राईम विभागाचे किरण जिरे व महाले यांनी विद्यार्थ्यांना सायबर क्राईम या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात नंदुरबार पोलिस विभाग दामिनी पथकाच्या प्रमुख ज्योती पाटील यांनी 'महिला सुरक्षा व महिला सबलीकरण' या विषयावर प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली. डॉ.प्रमोद खारकर यांनी 'आजचा युवक व व्यसनाधीनता' या विषयावर मार्गदर्शन केले. दुपार सत्रात एनटीव्हीएस विधी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.एस.एस. हसानी यांनी 'अँटी रॅगिंग व कायदेशीर तत्त्वे' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीटीपी महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागाचे डॉ.एस.यु. अहिरे यांनी विद्यार्थ्यांना 'तणाव व्यवस्थापन व तणाव पेपर व्यवस्थापनाचे कौशल्य' या विषयावर प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. अंतिम सत्रात 'आरोग्य क्षेत्रातील संवाद कौशल्य' या विषयावर डॉ.विजय चौधरी यांनी मार्गदर्शन केले.